:: ::

**नि. फौ.ख.क्र. ३२६/२०१२**

सरकार....वि. अनिल वाघमोडे

**निशानी क्र.– ३०**

अभियोग पक्षातर्फे **साक्षीदार क्र.२** यांची जबानी

मी शपथेवर सांगतो की,

माझे नांव– लखन शिवाजी भोसले

वय – ३२ वर्षे, धंदा – व्यापार

रा. बावडा, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

**सरतपासणी सरकारी विधीज्ञ श्री. एम. डी. करे यांचे मार्फत**

१. माझे ओम मोबाईल नावाचे दुकान हे बावडा येथील जनता सुपर मार्केट दुकानाच्या शेजारी आहे. दिनांक १६/११/२०११ रोजी मला पोलीसांनी पंचनाम्यासाठी जनता सुपर मार्केट येथे बोलाविले होते. पोलीसांनी माझे समक्ष जनता सुपर मार्केट दुकानात निरीक्षण करुन पंचनामा तयार केला होता. त्यावेळी पोलीसांनी मला दुकानातील वस्तुंच्या चोरीबाबत विचारले व मी त्यांना सांगितले. त्यानंतर पोलीसांनी पंचनाम्यावर सही करण्यास सांगितले. त्यानंतर मी त्यावर सही केली. आता मला दिनांक १६/११/२०११ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी अनुक्रमांक ०१ वर सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **निशाणी क्र.३१** देण्यात येते. त्यावेळी माझेसोबत दुसरा पंच नामे फिरोज शेख हा होता.

२. घटना ही दिनांक १५/११/२०११ रोजी घडली होती. मी सकाळी ०८.३० वाजण्याच्या सुमारास माझे दुकान उघडले होते. त्यावेळी जनता सुपर मार्केटसमोर गर्दी होते. सदरचे दुकान फोडले होते. मी सदर दुकानात गेलो होतो. त्याठिकाणी तेलाचे डबे, डि.व्ही.डी. प्लेअर, मोबाईल तसेच रोख रक्कम असे दुकानातून चोरीला गेले होते. पोलीसांनी माझ्याकडे चोरीबाबत चौकशी करुन माझा जबाब नोंदविले होता. सदरचे दुकान हे नवनाथ शिवाजी पवार यांचे आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलट तपास आरोपीं करीता विधीज्ञ श्री. बी. पी. जगताप यांच्या मार्फत–**

३. हे म्हणणे खरे आहे की, माझे दुकान हे शहाजीराव पाटील कॉम्प्लेक्समध्ये आहे.

माझ्या दुकानाच्या शेजारी जनता सुपर मार्केट दुकान आहे. सदर कॉम्प्लेक्समध्ये अंदाजे २० गाळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर दुकानाच्या समोरुन बावडा–रेडणी असा मोठा रस्ता वाहतो. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रस्ता हा रात्रभर वाहतुकीचा व रहदारीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कॉम्प्लेक्सच्या उत्तर दिशेला दुध गंगा डेअर आहे. सदर दुकानाच्या जवळ विकास पाटील यांचा बंगला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानाच्या समोरील रोडलगत एक कॉम्प्लेक्स आहे. सदर कॉम्प्लेक्स जवळ अनेक लोकांची घरे व वस्ती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी सदर कॉम्प्लेक्सच्या गाळ्यामध्ये हर्षवर्धन पाटील यांच्या पक्षाचा कार्यालय होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानाच्या पश्चिम बाजुस बावडा–भगतवाडी असा रस्ता वाहतो. सदर रस्त्याच्या शेजारी भंगाराचे मोठे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दुकानाला लागून घोगरे लोकांची घरे आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, शाळा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचे ठिकाण हे वर्दळीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, कॉम्प्लेक्समधील दुकाने अंदाजे रात्री १०.३० ते ११.०० वाजेपर्यंत उघडे असतात.

**४.** पंचनाम्यासाठी पोलीसांनी मला नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र.३० हा तयार करुन आणला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा पोलीसांनी मला वाचून दाखविला नव्हता तसेच त्यावर माझी सही घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हा माझ्या शेजारी राहण्यास आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीस मदत करण्यासाठी मी सदर पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणताही पंचनामा करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगणेवरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास – काहीही नाही.**

| | | |
|---|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत<br><br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर<br>दिनांक – ०३/०२/२०२६ | | समक्ष<br>Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI<br>Date: 2026.02.03 18:32:28 +0530<br>DISTRICT COURTS MAHARASHTRA<br>(एम.एच. फारुकी)<br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे. इंदापूर. |

**नि. फौ.ख.क्र. ३२६/२०१२**
सरकार....वि. अनिल वाघमोडे
**निशानी क्र.– २६**

अभियोग पक्षातर्फे **साक्षीदार क्र.१** यांची जबानी
मी शपथेवर सांगतो की,
माझे नांव– नवनाथ शिवाजीराव पवार
वय – ४८ वर्षे, धंदा – व्यापार
रा. रत्नप्रभादेवी नगर, बावडा, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे.

**सरतपासणी सरकारी विधीज्ञ श्री. एम. डी. करे यांचे मार्फत**

१. माझे सन २०११ मध्ये किराणा दुकानाचा व्यवसाय होता. माझे दुकानाचे नांव जनता सुपर मार्केट, बावडा असे होते. घटना ही अंदाजे १४ वर्षापूर्वी घडलेली आहे. दिनांक १४ तारखेला मी माझे किराणाचे दुकान बंद करुन रात्री ०९.०० वाजण्याच्या सुमारास घरी गेलो. त्यानंतर दुस–या दिवशी सकाळी ०७.०० वाजण्याच्या सुमारास मी दुकान उघडण्यास आलो असता दुकानाचे एक शटर उघडा असल्याचे दिसून आले. त्यावेळी मी व माझे सासरे शिवाजीराव भिमराव फडतरे, तसेच नातेवाईक लखन शिवाजी भोसले असे आम्ही दुकानात जावून पाहिले असता दुकानात चोरी झाल्याचे दिसून आले. सदर चोरीमध्ये रोख रक्कम रु.२५,०००/–, खोबरे तेलाच्या बाटल्या तसेच काही किराणा वस्तु तसेच एक नोकीया कंपनीचा मोबाईल, एक सोनी कंपनीचा सी.डी. प्लेअर, एक डि.व्ही.डी. प्लेअर असे चोरी झाल्याचे दिसून आले. त्यानंतर मी बावडा पोलीस दुरक्षेत्र येथे जावून सदर घटनेची खबर दिली. आता मला दिनांक १५/११/२०११ रोजीची मी दिलेली खबर दाखविण्यात आली, त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **निशाणी क्र.२७** देण्यात येते. आता मला दिनांक १५/११/२०११ रोजीचे जबाब दाखविण्यात आले, त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **निशाणी क्र.२८** देण्यात येते. त्यानंतर पोलीस माझे दुकानात आले व त्यांनी माझा जबाब नोंदविले. त्यावेळी मी पोलीसांना घटनास्थळाचे ठिकाण दाखविले. त्यानंतर पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केले.

२.		त्यानंतर माझे असे लक्षात आले की, माझ्या दुकानातील दोन पामतेलाचे डबे सुध्दा चोरीस गेलेले आहेत. त्यामुळे पोलीसांनी माझा पुरवणी जबाब नोंदविला. आता मला दिनांक १६/११/२०११ रोजीचा पुरवणी जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२९** देण्यात येते. चोरीस गेलेल्या वस्तु मला परत मिळाले नाहीत. मी चोरी करणा–या आरोपीस आजतागायत पाहिलेला नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलट तपास आरोपीं करीता विधीज्ञ श्री. बी. पी. जगताप यांच्या मार्फत–**

३.		माझे शिक्षण पोस्ट ग्रॅज्युएटपर्यंत झाले आहे. माझ्या दुकानाच्या बाजुला शहाजीराव पाटील कॉम्प्लेक्स आहे. माझ्या दुकानाच्या पूर्व बाजुला सदर कॉम्प्लेक्समध्ये वीस गाळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानाच्या समोरुन बावडा–रेडणी असा मोठा रस्ता जातो. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रस्ता हा रात्रभर वाहतुकीचा व रहदारीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानाच्या पश्चिम बाजुस बावडा–भगतवाडी असा रस्ता आहे तसेच सदरचा रस्ता सुध्दा रहदारीचा व वर्दळीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानाच्या पाठीमागे अंदाजे ५० लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दुकानाच्या पुर्व बाजुस अकलुज–इंदापूर हा रस्ता आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, लांब आहे. माझ्या दुकानाच्या उत्तर बाजुला गोपाळ दुध डेअरी आहे. सदर डेअरीच्या पाठीमागे अंदाजे ५० लोकांची घरे आहेत. सदर डेअरीच्या शेजारी विकास पाटील यांचा मोठा बंगला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कॉम्प्लेक्सच्या गाळ्यामध्ये हर्षवर्धन पाटील यांच्या पक्षाचा कार्यालय आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, घटनेच्यावेळी नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, माझे दुकान हे वर्दळीच्या ठिकाणी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दुकानाजवळ रात्री लोकांचे जाणे–येणे असते.

४.		हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेबाबत दुस–या दिवशी कळले होते. त्याबाबत मला व्यक्तीशः काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानात कोणी चोरी केली होती याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीची ओळख परेड घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानातून चोरी करणारे नेमके कोणते इसम होते ते आजतागायत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी देखील मला चोरी करणा–या कोणत्याही व्यक्तीचे नाव सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या

:: ::

सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास – काहीही नाही.**

| | | |
|---|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत<br><br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर<br>दिनांक – ०३/०२/२०२६ | | समक्ष,<br>Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI<br>Date: 2026.02.03 18:32:36 +0530<br>(एम.एच. फारुकी)<br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे. इंदापूर. |